# पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी मर्यादित, पुणे.

१३२९ कृष्णा अपार्टमेंट, सदाशिव पेठ, पुणे-४११०३० फोन : २४४८३३८२
रजिस्टर नंबर : पी.एन.ए./बी.एन.के. २८९, दिनांक ३०/६/१९७८

## सभेची नोटीस

पुणे माध्यमिक शाळा शिक्षकेतर सहकारी पतपेढी मर्यादित, या संस्थेची ४५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, **रविवार दि.०५/०९/२०२१** रोजी सकाळी ११.०० वाजता **ऑनलाईन** होणार आहे. तरी आपण या सभेमध्ये सहभागी व्हावे ही विनंती.

## सभेपुढील विषय

१. दि. ०८/११/२०२० रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२. सन २०२०-२१ च्या अंदाजापेक्षा जादा झालेल्या खर्चास मान्यता देणे.

२. सन २०२०-२१ या अर्थिक वर्षाचे तेरीजपत्रक, नफातोटा पत्रक, ताळेबंदपत्रक व वार्षिक अहवालास मान्यता देणे.

४. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२०- २१ च्या नफा वाटणीस मान्यता देणे.

५. सन २०२०-२१ चा लेखापरिक्षण अहवाल वाचून नोंद घेणे.

६. सन २०२१-२२च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.

७. सन २०१९-२० या वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोष दुरुस्तीस मान्यता घेणे.

८. मा. संचालक मंडळाचे कर्जाचा आढावा घेणे.

९. अंतर्गत लेखापरिक्षक व वैधानिक लेखापरिक्षकांची सन २०२१-२२ साठी नेमणूक करणे व मानधन ठरविणेबाबत.

१०. ४५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांची उपस्थिती क्षमापित करणेबाबत.

११. मा. अध्यक्षांच्या संमतीने आलेल्या आयत्या वेळच्या विषयांचा विचार करणे.

**दिनांक : २५/०८/२०२१**

**देवेंद्र पारखे**
**सचिव**

## सूचना

१. या वर्षीची वार्षिक सर्वसाधारण सभा ही ऑनलाईन होईल. अशा सभेत झालेले निर्णय सर्वांवर बंधनकारक राहतील.

२. मा. संचालक मंडळाने शिफारस केलेले तेरीजपत्रक, नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, अंदाजपत्रक व लेखापरिक्षण अहवाल हे सभासदांना पाहण्यासाठी पतपेढीच्या www.punentp.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

३. सभेचे कामकाज योग्य वेळेत आटोपता यावे या दृष्टीने अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक व अंदाजपत्रक ई. विषयासंबंधी प्रश्न विचारणे असल्यास सभासदांनी दि.१/९/२०२१ पूर्वी पतपेढीच्या pmsspatpedhi@gmail.com या इमेल वर विचारणा करावी किंवा पतपेढीमध्ये लेखी विचारणा करावी.

४. ज्या सभासदांचे मोबाईल नंबर्स पतपेढीकडे असतील त्यांनाच पतपेढीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस व लिंक मोबाईलवर व्हाट्सअपद्वारे पाठविण्यात येईल. ज्यांचे नंबर्स नसतील त्यांनी आपापल्या शाळेतील इतर सभासदांकडून सदरची माहिती घ्यावी किंवा पतपेढीमध्ये येऊन आपला मोबाईल नंबर देऊन माहिती घ्यावी.

५. या वर्षी कोव्हीड १९ च्या संसर्गीय रोगामुळे अहवाल छापला जाणार नाही याची सभासदांनी कृपया नोंद घ्यावी.

**सूचना :** वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये नफा विभागणी मंजूर झाल्यावर सभासदांचा लाभांश त्यांच्या बँकेतील खात्यांवर वर्ग करण्यात येईल याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.